Open Access
उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका
(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 366 – 368
DOI: 10.5281/zenodo.10128976

Original Research Article

# महात्मा गांधी यांचे स्वच्छताविषयक विचार

प्रा. डॉ. रविंद्र बाबुराव बाविस्कर

विभाग प्रमुख, सैनिकीशास्त्र विभाग, स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मुक्रमाबाद ता. मुखेड जि. नांदेड ४३१७१९ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: ravindrabaviskar3@gmail.com

Received: 12 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 27 October, 2023

## प्रस्तावना

स्वच्छता ही शारीरिक आरोग्य आणि निरामय वातावरणासाठी सर्वात महत्त्वाची आहे. त्यामुळे भारतात विविध सार्वजनिक ठिकाणी व आरोग्य केंद्रामध्ये स्वच्छतेविषयी जनजागृती करण्यात येते. स्वचछतेविषयी जनजागृती करण्यासाठी विविध शिबीरे, पथनाट्ये, वर्तमानपत्रात जाहिराती, शाळा-महाविद्यालये, सामाजिक, आध्यात्मिक, स्वराज्य संस्था, राजकीय पक्ष संघटना ह्या महात्मा गांधी यांच्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर देशात स्वच्छता मोहिम राबवून महात्मा गांधी यांचे स्वच्छताविषयक कार्य व विचार अंगिकारण्याचा प्रयत्न करतात. स्वच्छता मोहिम एखाद्या सण-उत्सवाप्रमाणे देशात साजरी करतात. स्वातंत्र्याच्या 75 वर्षानंतरही महात्मा गांधी यांचे स्वच्छताविषयक विचार सर्व भारतीयांना एकत्रीत आणू शकतात ही सत्यता या वेगवेगळया स्वच्छतेच्या अभियानातून पुढे आलेली आहे.

## महात्मा गांधी यांचे स्वच्छताविषयक विचार

महात्मा गांधी यांच्यासाठी स्वच्छता ही ईश्वर भक्तीपेक्षाही श्रेष्ठ होती. त्यांनी स्वच्छतेबाबत, स्वच्छ मन अस्वच्छ देहात राहू शकत नाही आणि स्वच्छ शरीर अस्वच्छ शहरात राहू शकत नाही असे परखड विचार मांडले होते. गांधीजींच्या स्वच्छता विषयक विचारांतून केवळ भारतातच नाही तर जगभरात महान संदेश दिले गेले होते.

महात्मा गांधी यांची संपूर्ण दिनचर्या ही स्वच्छतेवर आधारित राहिलेली आहे. त्यांच्या सहवासात येणाऱ्या व त्यांच्या आश्रमात राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तींना ते स्वच्छतेचे महत्त्व पटवून सांगत असत. स्वत:च्या हाताने घर व परिसराची साफसफाई करणे त्यांच्या व त्यांच्या अनुयायांच्या जीवनशैलीचे अंग बनले होते. महात्मा गांधी व त्यांच्या

अनुयायांनी स्वच्छतेवर भर दिला असला तरी उर्वरित देशातील जनतेने म्हणावे तितक्या प्रमाणात स्वच्छतेचे अनुकरण केलेले नाही हे वास्तव नाकारता येत नाही.

भारतात आज सर्वत्र स्वच्छतेची समस्या एक आव्हान असून तिने उग्र रूप धारण केलेले आहे. देशाच्या विकासासह जनतेच्या आरोग्यावर त्याचा दुष्परिणाम होत आहे. भारतात सार्वजनिक ठिकाणे, रेल्वे, बसस्थानके, चित्रपट, नाट्य, सभागृहे, भाजीपाला बाजार, विविध वस्त्या, चौक, उघड्यावरील व सार्वजनिक शौचालये, गटारी इत्यादी सारख्या ठिकाणी सर्वात जास्त अस्वच्छता आढळते. त्यामुळे व्यक्ती, समाज व राष्ट्र यांच्याशी स्वच्छतेचा बहुआयामी संबंध जोडणाऱ्या महात्मा गांधी यांच्या विचारांची आज देशाला नितांत गरज आहे, हे सत्य नाकारता येणारे नाही. त्यामुळे भारतात महात्मा गांधी यांना केंद्रबिंदू मानून भारत सरकारने 'स्वच्छ भारत अभियानाची' 2 ऑक्टोबर 2014 रोजी घोषणा केली. हे अभियान राबवित असताना महात्मा गांधी यांचा चष्मा स्वच्छतेचे प्रतिक दाखवून स्वच्छतेविषयी जनजागृती करण्यात येते.

महात्मा गांधी यांचे विचार व आचार हे नैतिकतेवर आधारित आहेत. त्यांच्या विचारातून निरोगी समाजमन व निर्मळ व्यक्तिमत्त्व घडविण्याची शाश्वती मिळते. त्यांच्या विचारांचा केंद्रबिंदू मानवाच्या सुखी जीवनाचा शोध राहिलेला आहे. त्यामुळे त्यांचे स्वच्छताविषयक विचार जनसामान्यांपर्यंत पोहोचणे ही काळाची गरज बनली आहे. महात्मा गांधींनी स्वच्छता ही स्वातंत्र्यापेक्षा जास्त महत्त्वपूर्ण आहे असे म्हटले होते. त्यांनी सामाजिक प्रतिष्ठा व विकास, शिक्षण आणि सार्वजनिक आरोग्य हे स्वच्छतेचे मूलभूत आधार मानून स्वच्छता हा नागरिकांचा हक्क आहे असे सूचित केले होते. गांधीजींच्या निरीक्षणात खेड्यातील रस्ते, सार्वजनिक दिवाबत्तीचा अभाव, शौचालयाची अपुरी संख्या, सार्वजनिक आरोग्याकडे दुर्लक्ष, अपुरा व अनियमित पाणीपुरवठा इत्यादी बाबी प्रकर्षाने निदर्शनास आल्या होत्या. त्यामुळे या भागातील अस्वच्छतेची समस्या दूर करण्यासाठी महात्मा गांधी यांनी गावातील सार्वजनिक ठिकाणी असणारी घाण, घनकचरा याची विल्हेवाट लावणे व त्यातून साथीच्या आजारांना अटकाव करता येई, गावाचे आरोग्य निश्चितपणे सुधारेल याबाबत आपले विचार मांडले होते. त्यांनी गावाला आरोग्याच्या सुविधा पुरविण्याची जबाबदारी ग्रामसेवकांवर सोपवली होती.

महात्मा गांधी यांनी ग्रामसेवकाने गावाचा भंगी, रखवालदार, वैद्य, शाळा मास्तर इ. कामे करावीत. यासाठी शासनाने ग्रामपंचायतींना निधी उपलब्ध करून द्यावा. जेणेकरून स्वच्छता, आरोग्य व अस्पृश्यता निवारण्याचे काम करणे शक्य होईल असे विचार मांडले होते.

महात्मा गांधी यांच्या मते, मानसिक अस्वच्छता ही शारीरिक अस्वच्छतेपेक्षा जास्त धोकादायक असते. जो कोणी खरोखर आतून स्वच्छ असतो तो बाहेरून अस्वच्छ राहू शकत नाही. त्यांनी मन व देहाची स्वच्छता ही शिक्षणातील पहिली पायरी असल्याचे मान्य केले. तसेच मनाच्या शुद्धीकरणाचे काम जसे प्रार्थना करते म्हणून आपण कुठल्याही कार्याची सुरुवात ही प्रार्थनेने करतो. हृदयाचे शुद्धीकरण हाच कुठल्याही प्रार्थनेचा मूळ हेतू असतो. त्याचप्रमाणे प्रत्येकाने

स्वत: स्वच्छ राहून आपला परिसर स्वच्छ व साफ ठेवण्यासाठी स्वत:च्या हातात झाडू व बादली घ्यावी असे त्यांचे प्रांजळ मत होते.

महात्मा गांधी यांनी खेड्यांना जखडून ठेवणाऱ्या समस्या त्यात सार्वजनिक स्वच्छतेची कमतरता, भरपूर सकस आहाराची कमतरता व खेडुतांचे अज्ञान दूर करण्यासाठी ग्रामस्वराज्य योजनेला महत्त्व दिले आहे. त्याशिवाय जीवन संपन्न होवू शकत नाही. निसर्ग हाच उत्तम वैद्य असतो असे त्यांचे मत होते. त्यामुळे त्यांनी आरोग्य, आहार, विहार, व्यायाम, निसर्गोपचार यावर चिंतन केलेले दिसून येते.

**निष्कर्ष**

महात्मा गांधी यांनी स्वच्छता हा मूलभूत हक्क मानून त्यात बदलाचे मोठे सामर्थ्य असल्याचे म्हटले आहे. त्यामुळे भारत सरकारने देशव्यापी स्वच्छता मोहिम त्यांच्या जयंतीनिमित्त हाती घेवून स्वच्छतेचा प्रश्न अग्रभागी आणलेला आहे. प्रसारमाध्यमे व प्रशासनाने स्वच्छतेच्या मुद्याला प्राथमिकता देवून महात्मा गांधी यांचे विचार जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य सुरू केले आहे. यासाठी सुंदर शहरे, स्वच्छ भारत अभियान, महात्मा गांधी स्वच्छ भारत कार्यक्रम, हागणदारी मुक्त गाव, घनरुप व द्रव्यरूप कचरा निर्मूलन, सुरक्षित व पुरेसे पेयजल व्यवस्था उपलब्ध करणे, उघड्यावर शौचास जाण्यास प्रतिबंध करणे इत्यादी सारखे अभियान हे गांधी विचारांतून प्रेरणा घेऊन उदात्त हेतूने राबविण्याचा प्रयत्न केलेला आहे. स्वच्छतेची धोरणे आणि योजना यांना पुरेसे पाठबळ उपलब्ध करून त्यांची प्रभावी अंमलबजावणी केल्याशिवाय शहरी-नागरी, ग्रामीण भागातील स्वच्छतेवर पुरेसा प्रभाव पडू शकत नाही. त्यासाठी राजकीय, शासकीय यंत्रणांची इच्छाशक्ती महत्त्वपूर्ण आहे. तसेच भारतातील सार्वजनिक ठिकाणे व मालमत्ता ही आपल्या मालकीची आहेत ती राष्ट्रीय संपत्ती आहे ही संकल्पना भारतीयांच्या मनात अजून पुरेशी रुजलेली नाही. ती रुजविण्यासाठी त्यांच्यात जनजागृती करणे खूप महत्त्वाचे असून त्यासाठी महात्मा गांधी यांचे स्वच्छताविषयक विचार खूप महत्त्वपूर्ण आहेत.

**संदर्भ सूची**

१. बी.वाय. कुलकर्णी, भारतीय राजकीय विचारवंत, विद्याभारती प्रकाशन, लातूर
२. व्ही.जी. कुलकर्णी व इतर, भारतीय राजकीय विचारवंत, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद
३. प्रभा कस्तुरे वाडकर, पाश्चिमात्य व भारतीय राजकीय विचारवंत, अरुणा प्रकाशन, लातूर
४. साहेबराव गाठाळ, आधुनिक भारतीय विचारवंत, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद
५. शोभा कारेकर, शरद घोडके, महाराष्ट्राचे शासन आणि राजकाररण, अंशूल पब्लिकेशन, नागपूर